# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १३४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.२२ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## विकास लवांडेंना अखेर अटक; वारकरी संप्रदायावरील वक्तव्य भोवले

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना अखेर पोलिसांनी अटक केली आहे. वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात पुणे न्यायालयाने त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. न्यायालयाने मुदतवाढीचा अर्ज फेटाळून लवांडे यांचे संरक्षण काढून घेतल्याने वाघोली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणामुळे राजकीय आणि वारकरी वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

वारकरी संप्रदायात घुसखोरी होत असल्याचा दावा विकास लवांडे यांनी केल्याचा आरोप होता. या वक्तव्याविरोधात नलिनी आशिष वायाळ (वय ४१, रा. येरवडा) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर लवांडे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालयाने यापूर्वी २० मेपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. तसेच तपास अधिकारी, सरकार पक्ष आणि वाघोली पोलिसांना याबाबत भूमिका मांडण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

# शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी 'सिबील'ची अट नाही

## मुख्यमंत्री फडणवीसांचे बँकांना आदेश; ३० जूनपूर्वी कर्जमाफी करणार असल्याचे स्पष्ट

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- सरकार ३० जूनपूर्वी कर्जमाफी करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. जूनमध्ये कर्जमाफी झाल्यानंतर शेतकरी पुढच्या वर्षासाठी पात्र राहतील, असेही शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळत नसल्याच्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले. सरकारचे पैसे जमा झाले नाही तरी एकदा यादी जाहीर केल्यानंतर बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज द्यावे, असे बँकांना निर्देश देण्यात आले असून, बँकांनी याला सहमती दर्शवल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांकडे सिबीलची मागणी कोणत्याही बँकेनं करू नये यासंदर्भात सर्व बँकांना सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पार पडली. या बैठकीला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीचे सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. या आढावा बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत कर्जमाफीसह खरीप हंगामशी निगडीत विविध गोष्टींवर भाष्य केले. यावर्षी दोन आव्हानं समोर असल्याचे फडणवीस म्हणाले. एल निनोमुळे कमी पाऊस आणि जागतिक परिस्थितीमुळे करावे लागणारे खतांचे नियोजन ही दोन आव्हानं यावेळी असणार आहेत, पण या दोन्हीचे योग्य नियोजन करण्याची ग्वाही फडणवीसांनी दिली.

''जास्तीजास्त शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकेल यासाठी नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा सरकारी आणि ग्रामीण बँका ६७ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतात. तर राष्ट्रीयकृत बँका २६ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतात. त्यांचं टार्गेट ८० टक्के आहे. त्यांनी ८० टक्क्यांच्या वर टार्गेट पूर्ण केलं पाहिजे'', असे फडणवीस म्हणाले. सिबीलची मागणी



कोणत्याही बँकेनं करू नये यासंदर्भात सर्व बँकांना सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. प्रत्येक शाखेला पीक कर्जासाठी सीबीलची अट नाही हे स्पष्ट आदेश काढले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

''यंदाच्या खरीप हंगामात अल निनोचं संकट आहे, हवामान खात्यानं मांडणी केलीय त्यात सरासरी पाऊस ८८ टक्के असेल असा अंदाज वर्तवला आहे. पश्चिम विदर्भ आणि मराठवाडा, आणि उत्तर महाराष्ट्राचा काही भागात पावसाची तीव्रता जास्त असेल. महाराष्ट्रात सर्वात मोठा हंगाम खरीपाचा असतो. राज्यात खरीपाचे १५२ लाख हेक्टर क्षेत्र आहे. यावर्षी राज्यात उतरत्या क्रमांने पाऊस पडण्याची शक्यता आहे. जूनमध्ये अधिक त्यापेक्षा कमी जुलै, त्यापेक्षा कमी ऑगस्टमध्ये असा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे पावसात अंतर पडण्याची शक्यता असून, त्याचा पिकावर देखील ताण येईल. जलयुक्त शिवाराची कामं वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत'', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

''प्रत्येक जिल्ह्यात आवश्यतेपेक्षा जास्त बियाणं उपलब्ध आहेत'', असे फडणवीस म्हणाले. राज्याला २०.१६ लाख मेट्रिक टन बियाणाची आवश्यकता आहे पण आपल्याकडे २८ लाख मेट्रिक टन बियाणं उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना सांगितले. ''राज्यात सोयाबीन, कापूस, तूर, मका, भात, बाजरी इ. पुरेपुर साठा आहे. सर्व बियाणं प्रमाणित असावी यासाठी साथी पोर्टल तयार करण्यात आलं आहे. साथी पोर्टलवर नोंदणीकृत असणारं बियाणंच खरेदी करावं'', असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी केले. यामुळे फसवणुक होणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

खतांच्या पुरवठ्यावर सरकारचं लक्ष असेल अशी ग्वाही फडणवीसांनी दिली. ''जागतिक परिस्थितीमुळे खतांच्या उत्पादनावर अधिक ताण असेल असे सांगताना औद्योगिक क्षेत्रासाठी खतं वळवली जात नाही आहे ना? याकडे लक्ष दिलं जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. महाविस्तार ॲप शेतकऱ्यांसाठी एकप्रकारचा कृषीतज्ज्ञ आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्याला विविध प्रकारची मदत मिळणार आहे'', असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. ''सगळ्या योजना ॲग्रीस्टॅकला जोडल्या असल्याने योजनांचा गैरफायदा कोणाला घेता येणार नाही'', असेही फडणवीस म्हणाले.

# नीट पेपरफुटी प्रकरणी डॉ.मनोज शिरुरेला सीबीआयकडून अटक

पुणे दि.२१ (प्रतिनिधी)- देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून आणखी एका आरोपीला सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेला हा आरोपी बालरोगतज्ज्ञ असून डॉक्टर मनोज शिरुरे असं त्याच नाव आहे.

मनोज शिरुरे याने शिवराज मोटेगावकरकडून स्वतःच्या मुलासाठी पेपर खरेदी केल्याचा आरोप आहे. नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयने मनोज शिरुरेला लातूरहून चौकशीसाठी पुण्यात आणलं होतं. या चौकशीनंतर मनोज शिरुला सीबीआयने अटक केली. हा डॉक्टर मनोज शिरुरे मूळचा लातूरचा आहे. आतापर्यंतच्या कारवाईतील ही पहिली अटक आहे, जी एखाद्या विद्यार्थ्याच्या पालकाला झालेली आहे. आतापर्यंत ज्यांनी नीटचा पेपर फोडला, नीटचा पेपर विकला...यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. परंतु आता नीटचा पेपर स्वत:च्या मुलासाठी खरेदी करणाऱ्या पहिल्या पालकाला सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. त्यामुळे नीट पेपरफुटी प्रकरण आणखी गडद होत आहे.

लातूर शहरात नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची कारवाई आणखी वेगाने सुरू असून, कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांच्या नेटवर्कमधील संशयितांवर तपास यंत्रणांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. रविवारीपासून लातूरमध्ये तळ ठोकून असलेल्या पथकाने काल संध्याकाळी जुना औसा रोड परिसरातील सिद्धिविनायक बाल रुग्णालय येथे पोहोचले. हे रुग्णालय बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांचे आहे. फुटलेला पेपर विकत घेतल्याच्या संशयावरून त्यांची तब्बल साडेचार तास कसून चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान काही कागदपत्रे, मोबाईल आणि डिजिटल पुरावे ने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. च्या प्राथमिक तपासात डॉ. शिरुरे हे शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे. मागील काही वर्षांपासून ते पेपरफुटीच्या नेटवर्कमध्ये सहभागी असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे.

नीटच्या पेपर फुटीचा कट शिवराज मोटेगावकरने त्याच्या साथीदारांना हाताशी धरुन अतिशय सुनियोजितपणे आखल्याचं सीबीआयच्या तपासात समोर येत आहे. त्यासाठी मोटेगावकरने सर्वात आधी त्याच्या क्लासमधे काम करणाऱ्या पीव्ही कुलकर्णीची एनटीएच्या प्रश्नपत्रिका सेट करणार्या पॅनलवर वर्णी लावून घेतली. सोबत मनीषा मांढरे हीची देखील च्या पॅनलवर वर्णी लावण्यात आली. कुलकर्णी केमिस्ट्री आणि मांढरे बायॉलॉजीच्या प्रश्नपत्रिका फोडणार आणि त्या मोटेगावकरपर्यंत पोहोच करणार अशी सोय करण्यात आली. वर्षानुवर्षे अध्यापनाचे काम केल्याने पीव्ही कुलकर्णीने केमिस्ट्रीच्या तर मनीषा मांढरेने बायोलॉजीच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न तोंडपाठ केले. मध्ये प्रश्नपत्रिका तयार करतानाच त्यांनी त्या प्रश्नपत्रिकांमधील प्रश्न तोंडपाठ केले. त्यानंतर ते हाताने लिहून काढून मोटेगावकरला पाठवले. मोटेगावकरने ते पीडीएफच्या स्वरुपात स्वत:च्या मोबाईलमधे सेव्ह करुन ठेवले आणि पुढे पैशांच्या बदल्यात त्यांची विक्री केली. ३ मे रोजी परिक्षा पार पडल्यावर मोटेगावकरने मोबाईलमधून ते डिलीट करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र सीबीआयने मोबाईलमधील डेटा रिकव्हर केला आणि मोटेगावकरला अटक झाली.

## मदरसांमध्ये 'वंदे मातरम' बंधनकारक; पश्चिम बंगाल राज्य सरकारचा निर्णय

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांच्या सत्तापालटानंतर मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यात एकापाठोपाठ एक मोठे निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. शाळांमध्ये 'वंदे मातरम' गीत अनिवार्य केल्यानंतर, आता राज्य सरकारने हा निर्णय आणखी पुढे नेत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त मदरसांमध्येही राष्ट्रीय गीत गायन बंधनकारक केले आहे.

मदरसा शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व अनुदानित, विनाअनुदानित आणि मान्यताप्राप्त मदरसांमध्ये सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी 'वंदे मातरम'चे गायन करणे आता सक्तीचे असेल. वर्ग सुरू होण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांना हे गीत गावे लागेल.

गेल्याच आठवड्यात राज्य सरकारने शालेय शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये 'वंदे मातरम'च्या सर्व सहा कडव्यांचे गायन अनिवार्य केले होते. त्यापाठोपाठ आता अवघ्या काही दिवसांतच मदरसांसाठीही हाच नियम लागू करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सोशल मीडियाद्वारे या निर्णयाची माहिती दिली. ''जुने नियम बाजूला करून, तात्काळ सर्व शाळा आणि मदरसांमध्ये सकाळच्या सत्रात वर्ग सुरू होण्यापूर्वी वंदे मातरम गायन बंधनकारक करण्यात आले आहे,'' असे एका परिपत्रकाव्दारे सरकारने स्पष्ट केले आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाला १५० कोटींचा निधी; राज्य सरकारचा निर्णय

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- मराठा समाजातील युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. नियोजन विभागाकडून यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात हा निधी वितरित करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांना मोठा आधार मिळणार आहे. विशेष म्हणजे, अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा दिलेल्या पार्श्वभूमीवर सरकारची ही घोषणा महत्त्वाची मानली जात आहे.

राज्य सरकारने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी एकूण ७५० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी यापूर्वी ३०० कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला होता. आता आणखी १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शासनाच्या नियमावलीनुसार हा निधी खर्च करताना सर्व वित्तीय नियम आणि अटींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निधीचा गैरवापर होणार नाही याची विशेष दक्षता घेण्याचे आदेशही संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. या माध्यमातून राज्यातील युवकांना व्यवसाय उभारण्यासाठी आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत मिळणार आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना २९ ऑगस्ट १९९८ रोजी करण्यात आली होती. या महामंडळामार्फत मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना कर्ज, अनुदान आणि विविध योजनांच्या माध्यमातून मदत दिली जाते. स्वयंरोजगार, लघुउद्योग आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी महामंडळ सातत्याने विविध योजना राबवत असते. या योजनांचा लाभ अधिकाधिक युवकांना मिळावा म्हणून लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २०१७ मध्ये वाढवण्यात आली होती. सुरुवातीला ही मर्यादा ६ लाख रुपये करण्यात आली आणि नंतर ती ८ लाख रुपयांपर्यंत नेण्यात आली. त्यामुळे अधिक युवकांना योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## वाल्मीक कराड गँगची कोर्टात मुजोरी; सुनावणीवेळी न्यायमुर्तीसमोर उडवली 'कॉलर'

बीड दि.२१ (प्रतिनिधी)- मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींची मुजोरी तुरुंगात गेल्यानंतरही तसूभरही कमी झालेली नाही. आरोपींना आज सुनावणीसाठी न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. यावेळी त्यांनी कायद्याचा वा न्यायालयाचा कोणताही धाक उरला नसलेले संतापजनक वर्तन केल्याचे समोर आले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कोर्टासमोर हजर केलेले असताना आरोपींनी थेट स्क्रीनवर कॉलर उडवून दाखवल्याची धक्कादायक घटना घडली. आरोपींच्या या उद्धट वर्तनामुळे आज दिवसभर बीडच्या न्यायालयीन आणि राजकीय वर्तुळात तीव्र संतापासह उलट-सुलट चर्चा रंगली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ४ जून २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

संतोष देशमुख हत्या खटल्याची नियमित सुनावणी आज न्यायालयात पार पडली. सुरक्षेच्या कारणास्तव कारागृहातून सर्व आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग प्रणालीद्वारे न्यायाधीशांसमोर सादर करण्यात आले होते. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेचे गांभीर्य आणि आदर बाजूला ठेवून आरोपींनी थेट कॅमेऱ्यासमोर आपली कॉलर उडवून दाखवत एक प्रकारे मुजोरीचे प्रदर्शन केले. आरोपींचे हे निर्ढावलेले कृत्य पाहून सुनावणी वेळी उपस्थित वकील, पोलीस आणि उपस्थित नागरिक अवाक झाले.

## पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाईंड हमजा बुरहान पिओकेमध्ये ठार

इस्लामाबाद दि.२१ (वृत्तसंस्था)- भारतात २०१९ साली पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलीस दलातील ४० जवानांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्याचा मास्टरमाईंड हमजा बुरहानची पाकव्याप्त काश्मीरमध्ये अज्ञाताकडून हत्या करण्यात आली आहे. डॉक्टर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या हमजाला अज्ञात बंदुकधाऱ्याने अनेक गोळ्या झाडल्या. मुझफ्फराबाद येथे झालेल्या हल्ल्यात हमजा मारला गेला. पुलवामाचा रहिवासी असलेल्या हमजाला केंद्रीय गृहमंत्रालयाने २०२२ साली दहशतवादी म्हणून घोषित केले होते.

पाकिस्तानचे समर्थन असलेल्या अल-बद्र या संघटनेच्या कामात त्याचा सक्रिय सहभाग होता. तर पुलवामा हल्ल्यात त्याची महत्त्वाची भूमिका होती, असे सांगितले जाते. न्यूज १८ ने सुरक्षा दलाच्या सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, हमजाच्या हत्येमुळे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाचा प्रचार, अतिरेक्यांची भरती आणि त्यांच्या साखळीला मोठा धक्का बसला आहे.

बुरहानचे खरे नाव अर्जुमंद गुलझार दार असे होते. पुलवामाच्या रत्नीपोरा भागातील खरबतपोरा येथे त्याचा जन्म झाला होता. २०१७ साली उच्च शिक्षणाच्या नावाखाली तो पाकिस्तानला गेला होता. पुढे तो बंदी घातलेली अतिरेकी संघटना अल-बद्रमध्ये सामील झाला आणि या संघटनेच्या कमांडर पदावर पोहोचला

काश्मीरमध्ये परतल्यानंतर बुरहानने तरुणांमध्ये कट्टरपंथी विचार पसरविण्यास आणि त्यांच्यावर प्रभाव टाकण्यास सुरुवात केली. दक्षिण काश्मीरच्या पुलवामापासून ते सोपियान पर्यंत त्याने त्याचे जाळे पसरवले होते. द प्रिंटने दिलेल्या बातमीनुसार, पुलवामामधील अनेक कुटुंबांनी सांगितले की, बुरहानच्या संपर्कात आलेले तरुण दहशतवादाकडे वळू लागले होते.

## नीटचा पेपर फुटलाच नाही, सीबीआय म्हणाली तरच मान्य करू

### संसदीय समितीपुढे एनटीए प्रमुखांचा दावा

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- देशातील सर्वात मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा असलेल्या नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली होती का, यावर चर्चा करण्यासाठी गुरुवारी राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एका मोठ्या संसदीय समितीसमोर बोलावण्यात आले होते. सूत्रांनुसार, विरोधी नेत्यांनी अनेक प्रश्न विचारले, परंतु एनटीएचे अधिकारी एकाही प्रश्नाचे थेट उत्तर देऊ शकले नाहीत. शिक्षण, महिला, बालके, युवक आणि क्रीडा विषयक संसदीय स्थायी समितीने गुरुवारी एनटीएच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलावले होते. काँग्रेस नेते दिग्विजय सिंह या समितीचे अध्यक्ष आहेत. एनटीएचे अध्यक्ष प्रदीप कुमार जोशी आणि एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह यांनी एनटीएचे प्रतिनिधित्व केले.

एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह (पान ४ वर)

## जागतिक पातळीवर पंतप्रधान रिजेक्ट माल!, काँग्रेस नेते नाना पटोलेंची नरेंद्र मोदींवर टीका

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी तरुण पिढीचा उल्लेख कॉकरोच असा केल्याच्या पार्श्वभूमीवर आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या ट्रेंडचा संदर्भ देत, काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. देशाच्या तरुण पिढीला अशा प्रकारची उपमा दिली जाणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगत, तरुणांचा सातत्याने होणारा अपमान आणि वाढती बेरोजगारी यामुळेच आजच्या तरुण वर्गात केंद्र सरकारविरोधात तीव्र असंतोष खदखदत असल्याचे पटोले यांनी स्पष्ट केले.

नाना पटोले म्हणाले, देशातील सुशिक्षित तरुण-तरुणी आणि पदव्युत्तर पदव्या घेऊनही बेरोजगार बसले आहेत. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून कधी त्यांना पकोडे तळण्याचा सल्ला दिला जातो, तर कधी इतर गोहस्ति सांगितल्या जातात. तरुणांचा हा पदोपदी होणारा अपमान आता त्यांच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेला आहे.

पंतप्रधानांमुळे जागतिक पातळीवर देशाची मन शर्मेने खाली गेली आहे. जागतिक पातळीवर पंतप्रधान रिजेक्ट माल आहेत, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे. मोदींच्या परदेश दौरे आणि त्यात होणाऱ्या घडामोडींवरून नाना पटोले यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, देवेंद्र फडणवीस नेहमी सांगतात की, पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांमुळे देशाचा फायदा होतो, अनेक महत्त्वपूर्ण करार केले जातात. मात्र, आता फडणवीसांनीच यावर उत्तर दिले पाहिजे की, इटलीमध्ये जाऊन तिथल्या महिला राष्ट्राध्यक्षांना चॉकलेटची भेट देणे कितपत योग्य आहे? पंतप्रधानांचे हे वर्तन हास्यास्पद असल्याची टीका पटोले यांनी केली आहे.

## रेल्वे भरती आंदोलनप्रकरणी राज ठाकरेंची निर्दोष मुक्तता



मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- २००८ साली रेल्वे भरती आंदोलन प्रकरणातून मनसेप्रमुख राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. ठाणे सत्र न्यायालयाने आज (२१ मे) निकाल दिला आहे. तब्बल १८ वर्षांनी सदर प्रकरणाचा न्यायालयाने निकाल जाहीर केला. या सुनावणीवेळी राज ठाकरे स्वत: उपस्थित होते.

सरकारी पक्षाने गुन्हा सिध्द होईल आणि आरोपींचा सहभाग स्पष्ट होईल असे ठोस पुरावे मांडले नसल्याचा निर्वाळा न्यायालयाने दिला. त्यामुळे पुराव्यानभावी राज ठाकरे यांना ठाणे सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. कथित चिथावणी दिल्याच्या आरोपातून राज ठाकरेंची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

राज ठाकरेंची निर्दोष मुक्तता झाल्यानंतर मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी न्यायालयाने राज ठाकरेंसह (पान ४ वर)

## कॉकरोच जनता पार्टीची सोशल मीडियावर 'त्सुनामी'; एक्स अकाऊंट ब्लॉक, तरीही 'कॉकरोच इज बॅक'ची तुफान एन्ट्री

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- अभिजीत दीपके यांनी सुरू केलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'ने अवघ्या काही दिवसांत सोशल मीडियावर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. विशेष म्हणजे, इन्स्टाग्रामवर सीजेपीच्या फॉलोअर्सचा आकडा तब्बल १ कोटी ४० लाखांच्या पुढे गेला आहे. हा आकडा भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत इन्स्टाग्राम फॉलोअर्सपेक्षाही जास्त आहे.भाजपच्या इन्स्टाग्राम फॉलोअर्सची संख्या सुमारे ८७ लाख इतकी असून एवढी संख्या असणारा भाजप हा देशात एक नंबरचा पक्ष होता.सीजेपीला युवकांमधून मोठा प्रतिसाद मिळत असतानाच आणखी एक मोठी घडामोड घडली आहे. काही तासांपूर्वीच सीजेपीचे एक्स (पूर्वीचे ट्विटर) अकाऊंट भारतात ब्लॉक करण्यात आल्याची माहिती समोर आली. मात्र, अभिजीत दीपके यांनी तत्काळ 'कॉकरोज इज बॅक' नावाने नवीन अकाऊंट सुरू करत पुन्हा सोशल मीडियावर जोरदार पुनरागमन केले आहे. या नव्या अकाऊंटवर अवघ्या काही तासांतच नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया आणि फॉलोअर्सचा पूर आला आहे.

विशेष म्हणजे, नवीन अकाऊंट सुरू करताना दीपके यांनी थेट भाजपवर अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे. 'आम्हाला ब्लॉक का करण्यात आले?' असा सवाल उपस्थित करत त्यांनी एक पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये भाजपचे निवडणूक चिन्ह असलेल्या कमळाला खात असलेला कॉकरोच दाखविण्यात आला आहे. त्यासोबत भाजप आणि सीजेपीच्या इन्स्टाग्राम फॉलोअर्सची तुलना करणारा ग्राफिकही पोस्ट करण्यात आला आहे.

या पोस्टमुळे सोशल मीडियावर नवा वाद निर्माण झाला असून, सीजेपीचे अकाऊंट ब्लॉक होण्यामागे राजकीय दबाव असल्याचा आरोप समर्थकांकडून केला जात आहे. 'युवकांच्या शक्तीला कमी लेखू नका,' असा संदेशही दीपके यांनी आपल्या पोस्टमध्ये दिला आहे.

दरम्यान, अभिजीत दीपके यांनी स्वतःचे खासगी अकाऊंट आणि सीजेपीचे इन्स्टाग्राम अकाऊंट हॅक करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचाही गंभीर दावा केला आहे.

## भाजपामध्ये सामील होण्याच्या निर्णयावर कोणी टीका करणं हा वैयक्तिक हक्कांच्या उल्लंघनाचा प्रकार नाही

### खासदार राघव चड्ढा यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाची टिप्पणी

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- काही दिवसांपूर्वी आम आदमी पक्षात मोठ्या राजकीय घडामोडी घडल्याचं पाहायला मिळालं होतं. खासदार राघव चड्ढा यांच्यासह आम आदमी पक्षाच्या राज्यसभेतील ७ खासदारांनी भाजपात जाण्याचा निर्णय घेतला. यामध्ये खासदार राघव चड्ढा, खासदार संदीप पाठक आणि खासदार अशोक मित्तल यांच्यासह आदी खासदारांचा समावेश आहे.

दरम्यान, राघव चड्ढा यांनी भाजपात जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्यावर सोशल मीडियासह विविध क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. त्यामुळे खासदार राघव चड्ढा यांनी आपल्या वैयक्तिक हक्कांच्या संरक्षणासाठी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज (२१ मे) सुनावणी पार पडली. यावेळी दिल्ली उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवलं आहे.

न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने (पान ४ वर)

# निसर्गाचा समतोल ढासळला; वाढत्या तापमानाने धोक्याची घंटा

**यंदाचा** उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९ सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल. ■

# तृनमूल काँग्रेसच्या निर्मूलनाची सुरुवात झाली आहे का?

'**ममता** बॅनर्जी' हे नाव देशभरात प्रसिद्धी पावले १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत. काँग्रेसच्या तिकिटावर जाधवपूर मतदारसंघातून निवडणूक लढवताना त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे दिग्गज नेते सोमनाथ चटर्जी यांचा धक्कादायक पराभव केला. त्यावेळी पश्चिम बंगाल हा कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला होता. राज्यात मार्क्सवादी पक्षाच्या नेतृत्वात डावी आघाडी सत्तेत होती आणि ज्योती बसू हे बंगालचे मुख्यमंत्री होते.ममता या डाव्या पक्षांच्या हाडवैरी होत्या.

ममताना बंगाल मधील काँग्रेस पक्ष पुरेसा आक्रमक वाटत नव्हता. प्रियरंजनदास मुन्शी त्यावेळी काँग्रेसचे बंगाल मधील प्रमुख नेते होते. ममता या बंगालमधील काँग्रेसला कलिंगडाची उपमा देत असत.कलिंगड हे जसे वरून हिरवे व आतून लाल असते त्याप्रमाणे काँग्रेसचे प्रादेशिक नेतृत्व आतून मार्क्सवाद्याना सामील आहे असा त्यांचा आरोप होता. लोकसभेत डाव्या आघाडीवर तोंडसूख घ्यायची एकही संधी त्या सोडत नसत.

काँग्रेसचे डाव्या पक्षांविरोधात असलेले मवाळ धोरण पसंत न पडल्याने ममतानी आपली वेगळी चूल मांडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी १९९८ च्या जानेवारी महिन्यात आपल्या स्वतंत्र तृणमूल काँग्रेसची स्थापना केली. काँग्रेसमध्ये फूट पडून बंगालमधील काँग्रेसचे अनेक तरुण कार्यकर्ते ममता दीदींना येऊन मिळाले.१९९८ मध्ये ममता अटल बिहारी वाजपायी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील झाल्या.वाजपायी मंत्रीमंडळात त्या रेल्वेमंत्री होत्या. त्यानंतर बंगालच्या विधानसभा निवडणुकीत भाजप -तृणमूल काँग्रेसची युती होती.

२००४ मध्ये एन. डी. ए. सरकारचा पराभव झाल्यावर कालांतराने ममता या काँग्रेस प्रणित यू. पी . ए. आघाडीमध्ये सामील झाल्या.लालू यादवनंतर त्या पुन्हा रेल्वेमंत्री झाल्या.त्यांनी भारतात सर्वप्रथम विना थांबा दुरांतो एक्सप्रेस सुरु केल्या. बंडखोर ममतानी लालू यादव यांच्या कारभाराचे अक्षरशः वाभाडे काढले. (लालूही त्यावेळी यु.पी. ए. मध्येच होते.) बंगालमध्ये ममतांचा डाव्या पक्षांविरुद्ध कडवा संघर्ष चालूच होता. बंगालमध्ये बांगला देशी घुसखोर मोठ्या प्रमाणात घुसले होते त्यावर लोकसभेत चर्चा करण्याची त्यांची मागणी अमान्य झाल्याने त्यांनी आपल्या हातातील फाईल सभापतींच्या दिशेने भिरकावली होती. या घटनेचा विडिओ उपलब्ध आहे. त्यांनी रस्त्यावर उतरून अनेक आंदोलने केली. सिंगूर मध्ये टाटाच्या नॅनो प्रकल्पाला त्यांनी प्रचंड विरोध केला. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी या कारखान्यासाठी देऊ नयेत म्हणून त्यांनी रक्तरंजित संघर्ष केला. परिणामी टाटानी बंगालमधून काढता पाय घेतला व नरेंद्र मोदींनी संधी साधून टाटाना गुजरातमध्ये आणले.

सिंगूरच्या लढ्याने ममतांची प्रतिमा एक लढाऊ महिला नेत्री अशी निर्माण झाली. एका मतिमंद मुलीवर कोलकत्यात बलात्कार झाला तेव्हा ममता त्या मुलीला घेऊन थेट मुख्यमंत्री बुद्धदेब भट्टाचार्जी यांच्या 'रायटर्स' इमारतीतील कार्यालयात गेल्या व तेथे त्यांनी ठिय्या आंदोलन केले.

दरम्यान सलग ३४ वर्षे सत्तेत असलेल्या डाव्या आघाडीविरोधात जनमत पेटले व २०११ मध्ये तृनमूल काँग्रेस -काँग्रेस यांच्या आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले आणि बंगालमध्ये 'ममता पर्व ' सुरु झाले.

२०१६ची विधानसभा निवडणूक त्यांनी स्वबलावर लढवून प्रचंड बहुमत मिळवले. त्यावेळी बंगालमध्ये समर्थ विरोधी पक्ष उरला नव्हता. त्यांनी बेरोजगार तरुणांना 'बेकारी भत्ता', मुलींच्या शिक्षणासाठी कन्याश्री योजना, गरीब महिलांसाठी 'लाखी भांडार' अशा कल्याणकारी योजना सुरु केल्या. त्यांनी राज्याची आरोग्य योजना पण सुरु केली. पण याच काळात ममतांचे रूपांतर एका 'हुकूमशाही ' नेत्यात झाले.

डाव्या आघाडीचे बांगला देशी नागरिकांविषयीचे तुष्टीकरणाचे धोरण त्यांनी जोमाने राबवायला सुरुवात केली. मुसलमानांची हक्काची मतपेढी निर्माण करण्यासाठी त्यांनी सर्व मर्यादा ओलांडल्या. बेकायदा बांगला देशी नागरिकांना आधार कार्ड, वोटर आय डी कार्ड, रेशन कार्ड देऊन त्यांना भारतात बस्तान बसवायची खुली सूट दिली. परिणामी हे परकीय नागरिक भारताचे 'अवैध' मतदार बनले.त्याचबरोबर टी एम सी या पक्षाचे रूपांतर गुंडाच्या टोळीत झाले. खंडणी खोरी, कट मनी, दहशतवाद, निरापराध लोकांच्या तसेच विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या हत्या, महिलांवरील अत्याचार, भ्रष्टाचार हीच तृणमूल काँग्रेसची ओळख बनली.ममतानी आपला भाचा अभिषेक याला आपला उत्तराधिकारी बनवून आपल्या पक्षाचे परिवारवादी पक्षात रूपांतर केले.

२०१९च्या लोकसभा निवडणुकीत तसेच २०२१च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने मुसंडी मारून प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान मिळवल्यावर ममतांचा तोल सुटला. त्यांनी केंद्रातील भाजप सरकारविरुद्ध अघोषित युद्धच पुकारले. आपण जणू रिपब्लिक ऑफ बंगालच्या सार्वभौम पंतप्रधान असल्याच्या अविर्भावात त्यांनी केंद्र सरकारच्या अधिकारालाच आव्हान दिले.बंगाली विरुद्ध बाहरी असा भावनात्मक मुद्दा निर्माण केला. भारताच्या बांगला देशच्या सीमेच्या सुरक्षेत हलगर्जीपणा केला.

बंगालच्या मतदारांनी अखेर १५ वर्षानंतर ममतांच्या या अराजकवादी सत्तेला उखडून टाकण्यासाठी २०२६च्या निवडणुकीत ९३% इतके विक्रमी मतदान केले आणि भाजपला प्रचंड बहुमताने सत्तेत आणले.

हा पराभव ममतांच्या जिव्हारी लागला आहे. त्यातच पक्षात मोठ्या प्रमाणात बंडखोरी सुरु झाल्याच्या बातम्या आहेत. पक्षाचे नेते /कार्यकर्ते सैरभैर झाले असून ते आता ममता व अभिषेक बॅनर्जीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करू लागले आहेत. बंगाली जनता तर ममतावर एवढी चिडली आहे की लोक ममता व अभिषेक यांची 'चोर चोर ' म्हणून उघड उघड संभावना करू लागले आहेत. काही खासदार व आमदार पक्ष सोडण्याच्या बेतात आहेत. एका पराभवाने उध्वस्त होत असलेल्या तृनमूल काँग्रेस या पक्षाला आता अस्तित्वाची लढाई लढण्याची वेळ आली आहे.त्यामुळेच २०३१ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत तरी हा पक्ष टिकेल का असा प्रश्न निर्माण झाला आहे. २०२६ चा पराभव ही तृनमूलच्या निर्मूलनाची सुरुवात तर नाही ना अशी साधार आशंका निर्माण झाली तर नवल नाही.

**- रघुनंदन भागवत**

# जैविक विविधता: मानवी अस्तित्वास आवश्यकता

**पूर्वी** घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाड लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी व फुलपाखरे बागडावीत. पण सद्याच्या स्थितीत पाहिले तर सगळीकडे काँन्क्रीटीकरण वाढलेले आहे. त्यामुळे आजूबाजूला जास्त परिसरच नाही व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोची झाडे लावली जातात. अस जर होत राहीले तर त्या फुलपाखरांनी बागडायचे कुठे? त्यांनी मध कुठे तयार करायचा? असा मानवाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा लेख जरूर वाचा... संपादक.

जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवसृष्टीची जैविक विविधता आणि परिवर्तनशीलता आहे. जैवविविधता हे जनुकीय, प्रजाती आणि परिसंस्थेच्या पातळीवरील भिन्नतेचे मोजमाप आहे. तलाव, तळे, नदी आदी परिसंस्थेचा अभ्यास करून तेथे पाहण्यात आलेल्या जैवघटकांची माहिती घेतली जाते. त्यात सजीवांमधील विविध जाती, परिसंस्था, बायोम किंवा पूर्ण पृथ्वीवर विविधता आढळून येते. परिसंस्थेमधील विविधता हे परिसंस्थेच्या निकोपपणाचे एकक आहे. ती बऱ्याच प्रमाणात भूभागाच्या हवामानावर अवलंबून असते. उदाहरणार्थ- उष्णप्रदेशीय भागामध्ये जैवविविधता अधिक तर ध्रुवीय भागामध्ये विविधता कमी असते. जैवविविधता पृथ्वीवर समप्रमाणात पसरलेली नाही. त्यांत विस्ताराची विविधता आढळतेच. एवढेच नव्हे तर एकाच प्रदेशामध्ये सुद्धा सारखेपणा आढळून येत नाही. सजीवांमधील विविधता ही तापमान, पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, समुद्र सपाटीपासूनची उंची, भूप्रदेशाचे गुणधर्म आणि सभोवती असलेले इतर सजीवांचे अस्तित्व यांवर अवलंबून असते. सजीवांच्या देशी जाती व अप्रिसंस्थेच्या वितरणाच्या अभ्यासास जैवभूगोल असे म्हणतात. विषुववृताजवळील उष्णप्रदेशामध्ये विविधता अधिक तर ध्रुवीय प्रदेशामध्ये कमी विविधता आढळते, हे वर आलेच आहे. सन २००६मध्ये आययूसीएन या संस्थेने दुर्मीळ किंवा अस्तित्व धोक्यात आल्याचे जाहीर केलेल्या सजीवांची संख्या ४०,१७७ एवढी होती. वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार अशा जातींची संख्या दहा लाखांवर पोहोचेल. भूप्रदेशावरील विविधता महासागरी विविधतेपेक्षा पंचवीस पटीनी अधिक आहे.

झपाट्याने होणाऱ्या परिसरातील बदलांमुळे सजीव सामूहिकरीत्या लुप्त होतात. एका अंदाजानुसार पृथ्वीवर असलेल्या एकूण सजीवांपैकी एक टक्का सजीव लुप्त झाले आहेत. सजीवांची पृथ्वीवर निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत पाच वेळा मोठ्या प्रमाणात आणि अनेक वेळा लहान प्रमाणात जैवविविधतेचा नाश झाला आहे. सुमारे चौप्पन कोटी वर्षांपूर्वी फेनेरोझोइक महाकल्पामध्ये जैवविविधतेचा महाविकास कॅम्ब्रियन कल्पामधील विविधतेचा स्फ़ोट या नावाने ओळखला जातो. बहुपेशीय सजीवांमधील सर्व संघांची निर्मिती झालेली होती. त्यांपुढील चाळीस कोटी वर्षांमध्ये जैवविविधतेचा पुन्हा पुन्हा नाश झालेला होता. कार्बोनिफेरस युगामध्ये सदाहरित वनांमधील वनस्पती आणि प्राण्यांचा नाश झाला. पर्मियन ट्रायासिक युगामध्ये पंचवीस कोटी वर्षांपूर्वी झालेला जैवविविधतेचा नाश सर्वात मोठा होता. तीन कोटी वर्षांपूर्वी पुष्ठवंशी सजीवांनी पुन्हा एकदा आपला जम बसवला. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी झालेला क्रिटेशियस-टर्शरी विनाश हा नजीकच्या काळातील जैवविविधतेचा नाश होय. याच काळात डायनॉसोर नष्ट झाले. जैवविविधतेत माणसाचा प्रवेश झाल्यानंतर ती आणि जनुकीय विविधता हळू हळू नाहीशी होत आहे. यास हॉलोसिन विनाश असे म्हटले जाते. मानवी हस्तक्षेपामुळे अधिवास नष्ट झाल्याने जैवविविधतेचा आतोनात नाश होत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जैवविविधतेच्या नाशाकडे लक्ष देण्यासाठी इसवी सनाचे २०११-२०२० हे दशक जैवविविधता दशक म्हणून जाहीर केले होते. पूर्वी घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाड लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी व फुलपाखरे बागडावीत. पण सद्याच्या स्थितीत पाहिले तर सगळीकडे काँन्क्रीटीकरण वाढलेले आहे. त्यामुळे आजूबाजूला जास्त परिसरच नाही व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोची झाडे लावली जातात. अस जर होत राहीले तर त्या फुलपाखरांनी बागडायचे कुठे? त्यांनी मध कुठे तयार करायचा?



आज अस्तित्वात असलेल्या जैवविविधतेमागे ३५० कोटी वर्षांचा इतिहास आहे. सजीवांची नक्की निर्मिती केव्हा झाली? हे जरी वैज्ञानिकाना सांगता आले नाही तरी पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर वीस ते तीस कोटी वर्षानंतर प्राथमिक रचना असलेले सजीव अस्तित्वात आले, यावर वैज्ञानिक ठाम आहेत. जैवविविधतेमुळे अनेक पर्यावरण सेवा उपलब्ध झाल्या आहेत. या सेवा प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्षपणे मानवी जीवन सुसह्य बनवतात. हवेच्या घटकांचे संतुलन, गोड्या पाण्याचे चक्र, यांचे मूल्यमापन अशक्य आहे. यामधील जैवविविधतेच्या मदतीचे रुपयात किंवा डॉलरमध्ये मूल्य केल्यास कोणत्याही प्रगत राष्ट्राला ते चुकवता येणार नाही. मृदेमधील अन्नघटक चक्र, सुपीक जमीन तयार करणे, अशी कामे मानवी प्रयत्नांनी करायची ठरवली तर ते अशक्य आहे. केवळ संतुलितपणे ज्या सेवा जैवविविधतेमुळे मिळतात त्या अमूल्य आहेत. एकच उदाहरण द्यायचे तर ते कीटकाद्वारे होणाऱ्या परागीभवनाचे द्यावे लागेल. कीटकांनी मानवास दिलेली ही देणगी पैसे खर्च करून करवून घ्यायची तर किती रक्कम द्यावी लागेल? याचा विचारच न केलेला बरा.

जैवविविधता विलोपनामध्ये अधिवास बदल किंवा अधिवास नाहीसा होण्याचा मोठा धोका उद्भवतो. सदाहरित जंगलामध्ये होत असलेली वृक्षतोड, लोकसंख्या वाढ, जंगलाच्या जमिनीत खाणकाम, हवा प्रदूषण, मृदा प्रदूषण आणि जल प्रदूषण याशिवाय जागतिक हवामान वाढ या सर्वाचा अधिवास बदलाशी संबंध येतो. अधिवासाचे क्षेत्रफळ आणि त्या अधिवासामध्ये असणाऱ्या जातींची संख्या परस्परांवर अवलंबून आहेत. त्यांतल्या त्यात आकाराने मोठ्या जाती व समुद्र सपाटीलगत असणाऱ्या जंगलातील जाती-अधिवास बदलास संवेदनक्षम आहेत. दक्षिण भारतातील सलग जंगलांचे पट्टे नष्ट झाल्याने पश्चिम घाट जंगलातील हत्ती उन्हाळ्यात पीक क्षेत्रामध्ये घुसतात. ऊस हे त्याना त्यांचे नैसर्गिक खाद्य वाटल्याने ते तेथेच राहतात. त्याना हुसकून लावण्याचा प्रयत्न केल्यास ते परत परत तेथेच येत राहतात. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यानंतर पुनर्वनीकरणात अस्तित्वात असलेल्या सर्व वनस्पती परत कधीच लावता येत नाहीत. एकाच प्रकारच्या वृक्षांचे पट्टे लावण्याने त्या परिसरामध्ये असलेली विविधता नष्ट होते. नॅशनल सायन्स फाउंडेशन यानी केलेल्या २००७च्या अभ्यासातून असे समजले की जैवविविधता आणि जनुकीय विविधता यांचा परस्पर संबंध आहे. जातींमधील विविधतेसाठी जातींत जनुकीय विविधता असणे आवश्यक आहे. एका घटकाचा अभाव म्हणजे दोन्हीमधील संतुलन संपणे होय. अशा वेळी परिसरात एकच जाती प्रबळ ठरते. पाळीव प्राण्यांच्या बाबतील हे सहज समजून येते. पशुपालनासाठी राखीव कुरणे म्हणजे फक्त दूध किंवा मांसासाठी जनावरे पाळणे, हाच प्रकार कृषिव्यवस्थेमध्ये घडतो. उत्पादन घटण्याच्या भीतीने दुसरी वनस्पती म्हणजे तण शेतामध्ये वाढू दिले जात नाही, अगदी तसे होय.

पृथ्वीवर एका वेळी सर्वाधिक किती सजीव राहू शकतील, ही पृथ्वी ग्रहाची सजीव धारण क्षमता झाली. उदा.एका हेक्टरमध्ये अधिकतम किती गव्हाचे उत्पादन घेता येईल याची जीवशास्त्रीय मर्यादा गणिताने काढता येते. जाति-विविधता किती असू शकेल, याचा अंदाजही काढता येतो. सागरी सजीवाची विविधता वृद्धिवक्र पद्धतीने तर भूमीवरील सजीवांची विविधता घातश्रेणीने वाढते. एका वैज्ञानिकाच्या मते चतुष्पाद प्राणी आजच्या घटकेला भूप्रदेशावरील ६४ टक्के प्रदेशातसुद्धा पोहोचलेले नाहीत. मानवी हस्तक्षेपाशिवाय चतुष्पाद सजीवांची वाढ अशा पद्धतीने होण्याची शक्यता आहे, की सर्व प्रकारच्या परिसंस्थेमध्ये चतुष्पाद पोहोचतील.

जेवढी पूर्वजांची संख्या अधिक तेवढी त्यापासून निर्माण होणाऱ्या पिढ्यांची संख्या अधिक असते. वृद्धीसाठी आवश्यक घटकांचा तुटवडा असल्यास सजीवांची विविधता कमी होते. मानवी हस्तक्षेपामुळे सद्या फक्त १०० वर्षामध्ये इतर सजीवांचा नाश होण्याची शक्यता आहे. मग सांगा भाऊ, मानवाचे अस्तित्व कायम तग धरून राहू शकेल का? म्हणून माणसा, तू जैवविविधता संरक्षित व संवर्धित कर, अन्यथा तुझा सत्यानाश झालाच म्हणून समज..!

आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन सप्ताहनिमित्त समस्त मानव जातीस प्रेरक शुभेच्छा !!

- संकलन व सुलेखन -

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
गडचिरोली, फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८६.

# अनुराग कश्यप दिग्दर्शित बॉबी देओल स्टारर 'बंदर'चा ट्रेलर रिलीज, भन्नाट स्टाईल आणि वेडेपणाने उडवले भान!




निखिल द्विवेदी यांच्या 'सॅफरन मॅजिकवर्क्स' निर्मित आणि 'झी स्टुडिओज'च्या सहकार्याने तयार होत असलेल्या 'बंदर' या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग कश्यप यांनी केले आहे. बॉबी देओल स्टारर या चित्रपटात अनेक दमदार कलाकारांची फौज पाहायला मिळणार आहे!

आपल्या दमदार टीझरमुळे संपूर्ण देशात चर्चा निर्माण केल्यानंतर, 'बंदर' (Bandar)च्या निर्मात्यांनी अखेर या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला आहे. हा ट्रेलर तुम्हाला ट्विस्ट्स, बोल्ड डायलॉग्स, अप्रतिम अभिनय आणि हलक्याफुलक्या विनोदांनी भरलेल्या एका भन्नाट दुनियेत आणखी खोलवर घेऊन जातो. मनोरंजनाच्या बाबतीत हा चित्रपट त्याच्या हटके आणि वेगळ्या शैलीमुळे अत्यंत रंजक वाटतो. बॉबी देओल पहिल्यांदाच दिग्दर्शक अनुराग कश्यप यांच्यासोबत काम करत असून, त्यांनी अनुराग कश्यप यांच्या खास सिनेमॅटिक विश्वात एक अतिशय वेगळी आणि अनोखी भूमिका साकारली आहे. प्रेक्षक ज्या दर्जेदार मनोरंजनाची इतक्या काळापासून वाट पाहत होते, त्याच प्रकारचा हा अनुभव असणार आहे.

'बंदर'चा ट्रेलर आज रिलीज झाला असून, अवघ्या अडीच मिनिटांत त्याने ते साध्य केले आहे जे अनेक हिंदी चित्रपट इंटरव्हलपूर्वीही करू शकत नाहीत म्हणजेच प्रेक्षकांना पूर्णपणे कथेत गुंतवून ठेवणे, आश्चर्यचकित करणे आणि शेवटी कोणाच्या बाजूने उभं राहायचं याचा विचार करायला भाग पाडणे. 'ॲनिमल' आणि 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' सारख्या सुपरहिट चित्रपटांनंतर बॉबी देओल येथे पूर्णपणे वेगळ्या भूमिकेत दिसत आहेत आणि त्यांनी ती जबरदस्तपणे साकारली आहे. ते स्क्रीनवर स्मार्ट, चार्मिंग आणि त्यांच्या व्यक्तिरेखेभोवतीच्या वेडेपणाशी अगदी सुसंगत वाटतात. अनुराग कश्यप यांच्या भन्नाट कथनशैलीत त्यांना पाहणे हा खरोखरच एक खास अनुभव आहे.

याशिवाय, 'बंदर'चा ट्रेलर सुरुवातीपासून शेवटपर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवतो. अनुराग कश्यप, जे पहिल्यांदाच बॉबी देओलसोबत काम करत आहेत, त्यांनी बॉबीला असा मोकळा अवकाश दिला आहे जो फार कमी दिग्दर्शक देतात. बॉबीनेही त्या प्रत्येक क्षणाचा पुरेपूर फायदा घेतला आहे. चित्रपटात ते एका अशा पूर्वीच्या प्रसिद्ध स्टारची भूमिका साकारत आहेत, जो आता केवळ उरलेल्या प्रसिद्धीच्या जोरावर जगत आहे. स्टेजवर अहंकारी आणि ताठर, पण स्टेजच्या बाहेर पूर्णपणे एकटा. अशा महिलांना राईट-स्वाइप करणारा ज्यांची नावंसुद्धा त्याला लक्षात राहत नाहीत. पण मग एक नाव पुन्हा समोर येतं आणि त्याच्यासोबत सुरू होतं एक प्रकरण. ट्रेलरच्या काही मिनिटांतच ज्याच्यावर आपण हसत असतो, तो अचानक तुरुंगाच्या सलाखांआड पोहोचतो. त्याच्या चेहऱ्यावरील हास्य नाहीसं होतं, टाळ्या थांबतात आणि पिंजरा बंद होतो. सान्या मल्होत्रा, राज बी शेट्टी, सपना पब्बी, सबा आझाद, ऋद्धी सेन, जितेंद्र जोशी, इंद्रजीत आणि नागेश भोसले यांसारख्या प्रतिभावान कलाकारांची दमदार उपस्थिती चित्रपटाला वेगळीच झळाळी देते. हा चित्रपट सत्य घटनांपासून प्रेरित असून, अशा एका व्यवस्थेभोवती फिरतो जी नेहमीच योग्य निर्णय घेत नाही. अनुराग कश्यप दिग्दर्शित आणि सुदीप शर्मा व अभिषेक बॅनर्जी लिखित 'बंदर' हा अगदी तसाच सिनेमा आहे ज्यामुळे अनुराग कश्यप यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. 'पाताल लोक', 'कोहरा' आणि 'उडता पंजाब'सारख्या उत्कृष्ट कथा देणारी हीच सुदीप शर्मा आणि अभिषेक बॅनर्जी यांची जोडी पुन्हा एकदा एक प्रभावी कथा घेऊन आली आहे. हा चित्रपट डार्क आहे, कुठलीही भीड न बाळगता वास्तव दाखवणारा आहे आणि योग्य-अयोग्य यांच्या सीमारेषा धूसर करणारा आहे. तुम्हाला काय विचार करायचा हे शिकवण्यात या चित्रपटाला रस नाही; त्याऐवजी तुमची नजर स्क्रीनवर खिळवून ठेवणे हाच त्याचा उद्देश आहे.

'बंदर'चे लेखन 'पाताल लोक', 'कोहरा' आणि 'उडता पंजाब'मागील प्रशंसित जोडी सुदीप शर्मा आणि अभिषेक बॅनर्जी यांनी केले आहे. अनुराग कश्यप दिग्दर्शित, निखिल द्विवेदी यांच्या 'सॅफरन मॅजिकवर्क्स' निर्मित आणि 'झी स्टुडिओज'च्या सहकार्याने तयार झालेला हा चित्रपट ५ जून २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# वैजापूरात माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांना अभिवादन करून दहशतवादी दिन विरुद्ध शपथ



वैजापूर, ता. २१ (प्रतिनिधी) - देशातील संगणक क्रांतीचे जनक, दहशतवादाच्या समूळ उच्चाटन साठी सर्वंकष प्रयत्न करणारे तसेच युवकांना १८व्या वर्षी मतदान हक्क मिळवून देणारे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या स्मृती दिन निमित्त येथील पालिकेच्या वैजिनाथ वाचनालयात वाचक वर्ग व जेष्ठ नागरिक यांनी गुरुवार(ता.२१) रोजी एकत्र येऊन प्रथम कै. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार टाकून अभिवादन केले.

जेष्ठ वाचक व नागरिक कारभारी नवगिरे, ईश्वर शिंपी यांनी प्रथम अभिवादन केले.जेष्ठ वाचक व नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी माहिती देऊन सर्व उपस्थितीताना 'दहशतवाद विरुद्ध दिन',ची शपथ ही दिली. या प्रसंगी ग्रंथालय सहाय्यक संजय राजपूत, वाचक अविनाश साबरे, गणेश देशपांडे, अनिल राजुळे, कारभारी नवगिरे, जलील शेख, रविंद्र साळुंके, विजय पडवळ, केंशवं, क्षीरसागर, बबन क्षीरसागर, बी.बी. थोरात व वाचक वर्ग उपस्थित होता. शेवटी एस.व्ही. राजपूत यांनी आभार मानले.

# शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे भारतरत्न व माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी पुण्यतिथी निमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी)- २१ व्या शतकातील आधुनिक भारताचे स्वप्न पाहणारे, विज्ञान-तंत्रज्ञान, संगणकीकरण व माहिती क्रांतीची भक्कम पायाभरणी करणारे तसेच लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेला बळ देणारे भारतरत्न, भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांना स्मृतिदिनी त्यांच्या सुभेदारी विश्रामगृह, दिल्ली गेट जवळील पूर्णाकृती पुतळ्याजवळ नवनियुक्त छत्रपती संभाजी नगर काँग्रेस कमिटी चे जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, शहर जिल्हाध्यक्ष ॲड. सय्यद अक्रम व माजी शहर जिल्हाध्यक्ष शेख युसूफ यांच्या नेतृत्वाखाली अभिवादन करण्यात आले.

यावेळी जेष्ठ नेते इब्राहिम पठाण, जगन्नाथ काळे, माजी नगरसेवक इक्बालसिंग गील, संघटन महासचिव इंजि. विशाल बन्सवाल, गंगापूर तालुकाध्यक्ष सूर्यकांत गरड, महेंद्र रमंडवाल, साहेबराव बनकर, अनिस पटेल, मोईन कुरेशी, शेख अब्दुल रईस, शेख कैसर बाबा, योगेश थोरात, डॉ. सिकंदर शेख, नदीम सौदागर, साजिद कुरेशी, शफीक शहा, जय दवणे, अनिल नलावडे, रमेश काळे, अनिता भंडारी, शीला मगरे, हेमा पाटील, इरफान पठाण, देवराव पाटील, विशाल वडकर, बाबासाहेब पवार यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उज्जैनमध्ये जमीन घोटाळा !

# महाकालची जमीन खासगी दाखवत भाजप आमदाराला विकली

उज्जैन, दि. २१ (वृत्तसंस्था) - मध्य प्रदेशातील उज्जैनमधील महाकाल मंदिराच्या पार्किंगसाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनीवरून वाद निर्माण झाला आहे. असा आरोप आहे की, सरकारी मालकीच्या या जमिनीचे आधी खाजगीकरण करण्यात आले आणि नंतर भाजप आमदार चिंतामणी मालवीय यांच्या मालकीच्या कंपनीला विकण्यात आले. आता, या जमिनीवर पंचतारांकित हॉटेल बांधण्याची योजना सुरू आहे. यावरून वाद पेटला आहे. याबाबतचे वृत्त एका वृत्तसंस्थेने दिले आहे.

हे प्रकरण अंदाजे ४५,००० चौरस फूट जमिनीशी संबंधित आहे. ही जमीन २ मार्च २०२६ रोजी युटोपिया हॉटेल अँड रिसॉर्ट प्रायव्हेट लिमिटेडने ३.८२ कोटी रुपयांना खरेदी केली. या कंपनीचे संचालक अलोटचे भाजप आमदार चिंतामणी मालवीय आणि त्यांचे भागीदार इक्बाल सिंग गांधी आहेत. तक्रारीनुसार, खसरा नोंदींखाली खरेदी केलेल्या जमिनीचा काही भाग सध्या महाकाल मंदिरासाठी पार्किंग लॉट म्हणून वापरला जात आहे. उज्जैनचे रहिवासी आणि तक्रारदार राजेंद्र कुवाल यांनी मुख्य सचिव, लोकायुक्त आणि ईओडब्ल्यू (EOW) यांच्याकडे कागदपत्रांसह तक्रार दाखल केली आहे. उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठात एक जनहित याचिकाही दाखल करण्यात आली आहे. तक्रारीत असा आरोप आहे की, खसरा नोंदींखाली खरेदी केलेल्या जमिनीपैकी काही जमीन १९५० आणि १९६७-६८ च्या महसूल नोंदींमध्ये सरकारी जमीन म्हणून नोंदवण्यात आली होती. यापैकी काही जमीन सध्या महाकाल मंदिरासाठी पार्किंग म्हणून वापरली जात आहे. नंतर, संगनमताने, ती खाजगी खात्यांमध्ये नोंदवण्यात आली. असा आरोप आहे की, ही जमीन सरकारी जमीन असल्याची माहिती मालवीय यांना होती.

# कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'सिल्क स्कॅनर' ठरणार रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान



छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी)- भारतातील सर्वात मोठ्या मानल्या जाणाऱ्या ॲग्रो हॅकथॉन स्पर्धेमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन सादर करून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करणारे निवृत्त रेशीम उपसंचालक श्री दिलीप हाके यांना महाराष्ट्र शासनातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चषक, सन्मानपत्र आणि १५ लाख रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

**ॲग्रो हॅकथॉन स्पर्धेत श्री दिलीप हाके यांचा गौरव**

श्री हाके यांनी विकसित केलेले 'सिल्क स्कॅनर' हे अत्याधुनिक उपकरण भविष्यात रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठे वरदान ठरणार असल्याचे मत कृषी व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्पेक्ट्रोमिती संवेदक आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले हे उपकरण रेशीम कोषांची गुणवत्ता अचूकपणे तपासण्यास सक्षम आहे.

सध्या बाजारपेठेत रेशीम कोषांची किंमत व्यापाऱ्यांकडून कोष हातात घेऊन अंदाजाच्या आधारे ठरवली जाते. त्यामुळे अनेकदा शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळत नाही. या पार्श्वभूमीवर विकसित करण्यात आलेले 'सिल्क स्कॅनर' हे यंत्र रेशीम कोषांचे वैज्ञानिक परीक्षण करून शेतकऱ्यांना पारदर्शक व योग्य दर मिळवून देण्यास मदत करणार आहे.

या यंत्राच्या सहाय्याने एका किलोमधील रेशीम कोषांची संख्या, कोषातील रेशमाचे प्रमाण, कोषांची गुणवत्ता, आकारमान तसेच इतर महत्त्वाचे मापदंड काही क्षणांत तपासता येणार आहेत. त्यामुळे रेशीम खरेदी-विक्री प्रक्रियेत पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होणार आहे.

विशेष म्हणजे, या उपकरणामध्ये आवश्यक तांत्रिक बदल करून इतर विविध शेतमालाची गुणवत्ता तपासण्यासाठीही त्याचा उपयोग करता येणार असल्याचे श्री हाके यांनी सांगितले. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. श्री दिलीप हाके यांच्या या अभिनव संशोधनामुळे महाराष्ट्रातील रेशीम उद्योगाला नवी दिशा मिळणार असून, कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाधारित परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# ठाण्यात गावदेवी मार्केटला भीषण आग; दोन जणांचा मृत्यू,

ठाणे : ठाणे पश्चिममधील नौपाडा परिसरातील गोखले रोडवरील गावदेवी भाजी मार्केटच्या इमारतीला गुरुवारी पहाटे भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या दुर्घटनेत ठाणे महानगरपालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून अग्निशमन दलाचे दोन जवान जखमी झाले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.स्थानिक नगरसेवकांनी पहाटे ३ वाजून ४३ मिनिटांच्या सुमारास ठाणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला घटनेची माहिती दिल्यानंतर तात्काळ अग्निशमन आणि बचावकार्य सुरू करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच अनेक नागरी आणि आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या.

या आगीत मृत्यू झालेल्यांची ओळख ठाणे महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षक काळू शंकर गाडेकर (५३) आणि ठाणे अग्निशमन दलातील स्टेशन अधिकारी सागर शिंदे (४३) अशी पटली आहे. बचावकार्यादरम्यान अग्निशमन दलाचे स्टेशन ऑफिसर सुजित पष्टे (४५) आणि अग्निशमन दलाचे जवान समीर जाधव (४०) हे जखमी झाले. दोघांनाही तातडीने कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनास्थळी अतिरिक्त आणि उप आयुक्तांसह वरिष्ठ पालिका अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच एमएसईडीसीएलचे कर्मचारी उपस्थित राहून परिस्थितीवर देखरेख करत आहेत.

# विकासात्मक दूरदृष्टीचे स्व. पंतप्रधान राजीव गांधी

**देशाची** सर्वच क्षेत्रात उत्तम उन्नती व्हावी. युवकांचा लोकशाही शासन प्रणालीत जास्तीत जास्त सहभाग वाढावा, त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्था अधिक बळकट व्हावी ,देशातील दहशतवाद संपावा,देशात संगणक क्रांती सर्वप्रथम आणून त्या अनुषंगाने देशाच्या विविध क्षेत्रात संगणक क्रांती घडवून आणणारे दूर दृष्टीचे स्व,पंतप्रधान राजीव गांधी विकासात्मक दृष्टी असलेले पंतप्रधान होऊन गेले.त्यांना संगणक क्रांतीचे जनक संबोधतात.



पंतप्रधानाची धुरा सांभाळल्या बरोबर त्यांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी देशाची शक्ती व आधारस्तंभ स्मजल्या जाणाऱ्या देशातील युवकांसाठी एक नवा दृष्टीकोन, नवी स्वप्ने, नवी दृष्टी त्यांनी अवलंबिली. लोकशाहीच्या बळकटीकरणसाठी त्यांनी युवा वर्गाचे मतदान करण्याचे वय २१वरून १८वर्षावर आणले. युवकांना १८वर्ष वयात मतदान हक्क मिळाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेत व राज्य, देश पातळीवर युवकांना स्थान मिळालेव कर्तृत्वसम्पन्न लोकप्रतिनिधी निवडल्या जाऊ लागले, यामुळे लोकशाही शासन प्रणाली व पंचायत राज बळकटी करणाला सहाय्य झाले.आज देशात जे संगणकाचे जाळे पसरले आहे,याचे मूळ जनक स्व.पंतप्रधान राजीव गांधी होत.राजीव गांधींच्या दूरदृष्टीपणामुळेच देशात नवीन तंत्र प्रणाली आली. आज संपूर्ण जगाला आदर्श ठरेल अशी संगणक प्रणाली देशात आहे. देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापनेसाठी राजीव गांधींनी पंजाबातील दहशतवाद,आसामच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन, मिझोराम राज्यातील दहशतवाद यावर चर्चा, परिसंवाद, बैठका आयोजित केल्या,प्रत्यक्ष चर्चा करून या वादांवर तोडगे काढण्यात यश मिळवले. देशात मोठ्या प्रमाणात शांतता,व सुव्यवस्था स्थापित करण्यात यश प्राप्त केले. त्रिस्तरिय पंचायत राज व्यवस्था अधिक प्रभावशाली व लोकाभिमुख व्हावी म्हणून त्यांना अधिकचे अधिकार देऊन या त्रि- स्तरीय व्यवस्थापनेला अधिक बळकट केले.एक दूरदृष्टी असलेला उमदा व कर्तृत्व सम्पन्न पंतप्रधान राजीव गांधी यांना काही अपप्रवृत्तीनी २१मे,१९९१रोजी एका बॉम्बस्फोटात उडवून दिले.या महान व दूरदृष्टी असलेल्या स्व,राजीव गांधी यांच्या स्मृतींना अभिवादन.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांचे बजेट कोलमडले

**खरीप** हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी सध्या आर्थिक अडचणीत सापडलेला आहे.कांद्याला भाव नाही. खताचे वाढललेले दर, डिझेलचा तुटवडा, बी-बियाणे दरात भरमसाठ वाढ, कीटक नाशक औषधीच्या किमती वाढल्या, फवारणी यंत्र चे दर वाढले, पाईप व ठिबक पाईप विद्युत मोटारीचे भाव वाढले, नांगरणी, वखरणी साहित्य ही महागडे झाले. हे सर्व पाहता आज शेतकऱ्यांचे बजेट पेरणी पूर्वीच कोलंमडल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत आलेला आहे.खताचा पुरेसा साठा नसल्याने बी-बियाणे व इतर शेतीसाठी आवश्यक वस्तू घेण्यासाठी शेतकरी वर्गाला वारंवार दुकानदारांकडे फेऱ्या माराव्या लागत आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आर्थिक व भौतिक स्थिती अत्यंत डबघाईला आलेली आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या या डबघाईस आलेल्या स्थितीचा तात्काळ विचार करून शेतकऱ्यांसाठी शेतीपयोगी साहित्य खरीप हंगाम पेरणीपूर्वी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे अशी अपेक्षा आहे.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# नीट पेपरफुटी प्रकरणात बीड कनेक्शन? अंबाजोगाईतील शिक्षिका आईसह बहीण- भावाची सीबीआयकडून चौकशी

बीड दि.२१ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटी प्रकरणात आता बीड आणि लातूर कनेक्शन अधिक गडद होताना दिसत आहे. अंबाजोगाईतील दोन विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या शिक्षिका आईची केंद्रीय अन्वेषण विभागाकडून तब्बल सव्वादोन तास कसून चौकशी करण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. चौकशी करण्यात आलेले हे दोन्ही बहीण-भाऊ लातूरमध्ये शिक्षण घेत होते. यापैकी बहीण रिपीटर विद्यार्थीनी असून ती पुन्हा नीट परीक्षा देत होती. तर भाऊ पहिल्यांदाच परीक्षेला बसला होता. हा पेपर या दोघांसाठीच घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

सीबीआयच्या चौकशीनंतर अंबाजोगाई परिसरात मोठी चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चौकशीदरम्यान विद्यार्थ्यांच्या शिक्षिका असलेल्या आईलाही प्रश्न विचारण्यात आल्याने तपासाची व्याप्ती वाढल्याचे दिसून येत आहे.

नीट घोटाळ्याचा कथित मास्टरमाईंड पी. व्ही. कुलकर्णी याचे बीड कनेक्शन समोर आल्यानंतर आता आणखी एक धक्कादायक बाब उघड झाली आहे. बीडमधील 'प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन' या शिक्षक संघटनेचा शिवराज मोटेगावकर ब्रँड अँबेसिडर असल्याचं समोर आलं. २०२४ मध्ये या संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाच्या लेटरहेडवर मोटेगावकरचा 'ब्रँड अँबेसिडर' असा उल्लेख आढळून आला आहे.

यामुळे मोटेगावकरशी संबंधित क्लास चालक आणि शैक्षणिक नेटवर्कही आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. बीड शहरातील शाहूनगर परिसरात अनेक कोचिंग क्लासेस आणि शिक्षण संकुले कार्यरत असून या भागाला शैक्षणिक हब म्हणून ओळखलं जातं.

नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासामुळे चर्चेत आलेल्या लातूरमधील आरसीसी कोचिंग क्लासेसमध्ये आता विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आलं आहे. संस्थेचे मुख्य संचालक म्हणून ओळखला जाणारा शिवराज मोटेगावकर सध्या सीबीआयच्या ताब्यात असताना, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी संस्थेकडून प्रयत्न सुरू असल्याचं दिसत आहे.

नीट परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असून त्याबाबत विद्यार्थ्यांमधील असलेला संभ्रम लक्षात घेऊन आरसीसीच्या नियोजन समितीने सराव परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मोठ्या संख्येने विद्यार्थी कॅम्पसमध्ये दाखल झाले आहेत. परीक्षा पद्धतीनुसार त्यांची तयारी करून घेतली जात आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे राज्यभरात खासगी कोचिंग संस्थांबाबत मोठी चर्चा सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांमध्येही प्रचंड चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचा अभ्यास खंडित होऊ नये आणि त्यांचा आत्मविश्वास कायम राहावा यासाठी सराव परीक्षांचे नियोजन करण्यात आल्याचे सांगितलं जात आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ





**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ घेण्यात आली. उपजिल्हाधिकारी (सामान्य) संगिता राठोड यांनी उपस्थितांना ही शपथ दिली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.**

# उच्च न्यायालयाचा बीएसएनएलला मोठा धक्का: जातपडताळणीच्या नावाखाली रोखलेली पेन्शन तत्काळ देण्याचे आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी)- मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एक महत्त्वपूर्ण निर्णय देताना भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) ला आदेश दिला आहे की त्यांनी आपल्या दोन निवृत्त कर्मचाऱ्यांची रोखलेली पेन्शन व इतर सेवानिवृत्ती लाभ चार आठवड्यांच्या आत जाहीर करावेत. न्यायमूर्ती किशोर सी संत आणि न्यायमूर्ती सुशील एम. घोडेसवार यांच्या खंडपीठाने बीएसएनएलने दाखल केलेल्या रिट याचिका फेटाळून लावत कर्मचाऱ्यांच्या बाजूने दिलेल निर्णय कायम ठेवला.

यालयाने स्पष्टपणे नमूद केले की, सेवा कालावधीत जातवैधता दावा कधीही अवैध ठरविला गेला नाही, त्यामुळे बीएसएनएल पेन्शन न्या रोखण्यास न्याय्य नाही. शिवाय, निवृत्तीनंतर जातदावा अवैध ठरला तरीही पेन्शन देणे बंधनकारक आहे असेही न्यायालयाने नमूद केले.

तपशीलानुसार, नारायण हरी वैदकर (वय ५७, रा. चाळीसगाव, जि. जळगाव) आणि धोंडू टोपालू कचरे (वय ६०, रा. भुसावळ, जि. जळगाव) यांर्न बीएसएनएलच्या स्वैच्छिक सेवानिवृत्ती योजना (व्हीआरएस-२०१९) अंतर्गत दिनांक ३१ जानेवारी २०२० रोजी निवृत्ती घेतली होती. बीएसएनएलने जातपडताळणी प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव त्यांची पेन्शन रोखली होती. या प्रकरणात कर्मचाऱ्यांच्या वतीने ॲड. सौद देशमुख यांनी ॲड आर. टी. दिवाते यांच्या वतीने न्यायालयात बाजू मांडली.

ॲड. सौद देशमुख यांनी युक्तिवाद केला की, बीएसएनएल हे सिद्ध करण्यास सपशेल अपयशी ठरले की, या कर्मचाऱ्यांची नियुक्ती आरक्षित प्रवर्गातील (राखीव जागा) पदावर झाली होती. सर्व्हिस बुकमध्ये केवळ जात/जमातीची नोंद असणे, हे त्यांची नियुक्ती आरक्षित पदावर झाली याचा पुरावा नाही त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयांचा संदर्भ देत सांगितले की, निवृत्तीनंतर केवळ जातपडताळणी प्रमाणपत्राच्या आधारे पेन्शन रोखणब बेकायदेशीर व भेदभावपूर्ण आहे.

न्यायालयाने हे देखील अधोरेखित केले की, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग (जात प्रमाणपत्र देणे व पडताळणी करणे) अधिनियम, २०००च्या कलम ६ (३) अन्वये जात पडताळणीसाठी प्रस्ताव सादर करणे है नियोक्त्याची (बीएसएनएल) जबाबदारी आहे, कर्मचाऱ्याची नव्हे. बीएसएनएलने आजपर्यंत असा कोणताही प्रस्ताव जात छाननी समितीकडे सादर केलेल नाही. न्यायालयाने हे प्रकरण केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (कॅट), मुंबई यांचा आदेश कायम ठेवत बीएसएनएलला आदेश दिला की, या निर्णयाची प्रतब अपलोड केल्यापासून चार आठवड्यांच्या आत नियमित पेन्शन, सेवानिवृत्ती लाभ आणि सर्व अनुषंगिक लाभ व थकबाकी कायद्यानुसार अदा करावी. य प्रकरणात खर्चाबाबत कोणताही आदेश देण्यात आलेला नाही.

# अकोल्यातील सिटी हॉस्पिटलमध्ये आग

अकोला, दि. २१ (प्रतिनिधी) - अकोल्यातील रामदासपेठ परिसरात आज म्हणजेच गुरुवार २१ मे दुपारी मोठी खळबळ उडाली. शहरातील प्रसिद्ध 'सिटी हॉस्पिटल'ला अचानक भीषण आग लागल्याने खळबळ उडाली. गजबजलेल्या मध्यवर्ती भागात असलेल्या या रुग्णालयातून धुराचे मोठमोठे लोट बाहेर येताना दिसताच परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेच्या वेळी हॉस्पिटलमध्ये विविध आजारांवर उपचार घेणारे अनेक रुग्ण दाखल होते. त्यामुळे रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि रुग्णालय प्रशासनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

आगीची माहिती मिळताच हॉस्पिटल प्रशासनाने तातडीने रुग्णांना सुरक्षितस्थळी हलवण्यास सुरुवात केली. डॉक्टर, नर्स, सुरक्षा रक्षक आणि स्थानिक नागरिकांनी जीवाची पर्वा न करता रुग्णांना बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. विशेषतः अतिदक्षता विभागातील (खउण) गंभीर रुग्णांना स्ट्रेचर आणि व्हीलचेअरच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले. काही रुग्णांना ऑक्सिजन सिलेंडरसह बाहेर हलवण्यात आले असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांकडून आग आटोक्यात आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# पूरनियंत्रण, आरोग्य सेवा, वीजपुरवठा व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवा-विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील सर्व जिल्हा प्रशासनांनी आपत्ती व्यवस्थापन, पूरनियंत्रण, आरोग्य सेवा, वीजपुरवठा आणि नागरी सुविधांबाबत आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण करून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

विभागीय आयुक्तालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी मराठवाड्यातील जिल्हानिहाय मान्सूनपूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेतला. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम., कर्नल नंदकिशोर खडसे, सह आयुक्त रिता मेत्रेवार, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, प्रभारी सहायक आयुक्त (महसूल) सरिता सुत्रावे, उपायुक्त (पुरवठा) सुधाकर पवार यांच्यासह प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच बैठकीस विभागातील जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस प्रशासन, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, आरोग्य विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. शहरी व ग्रामीण भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी नाल सफाईची सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत. दरवर्षी पाणी साचणाऱ्या ठिकाणांची विशेष पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या.

नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कता वाढविणे, पूरस्थिती निर्माण झाल्यास स्थलांतरासाठी सुरक्षित ठिकाणांची तयारी ठेवणे तसेच बचाव पथकांना सज्ज ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. पूरप्रवण गावांची अद्ययावत यादी तयार ठेवण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी जुन्या व धोकादायक इमारतींची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही, यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

# जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत; शांतता व संयम राखा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- गेल्या काही दिवसापासून जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपांवर इंधन खरेदीसाठी नागरिकांनी विनाकारण गर्दी केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. सोशल मीडियावरील काही चुकीच्या संदेशांमुळे नागरिकांमध्ये इंधन टंचाईबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. जिल्ह्यात पेट्रोल डिझेलचा पुरवठा सुरळीत असून नागरिकांनी शांतता व संयम राखावा,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नाही. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून जिल्ह्यातील तेल कंपन्यांच्या डेपोमधून सर्व पेट्रोल पंपांवर नियमित मागणीपेक्षा ३० टक्क्यांनहून अधिक अतिरिक्त पुरवठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. इंधनाचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असून पुरवठा साखळी पूर्णपणे सुरक्षित आहे.

सोशल मीडिया (व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक इ.) वर इंधन टंचाई किंवा वाहतूक बंद असल्याबाबतचे जे मेसेज फिरत आहेत, ते अपूर्ण माहितीवर आधारित, तसेच चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहेत. नागरिकांनी अशा कोणत्याही अफवांना बळी पडू नये, तसेच असे संदेश फॉरवर्ड करू नयेत.

नागरिकांनी भीतीपोटी गाड्यांच्या टाक्या फुल करणे किंवा कॅन/डब्यांमध्ये इंधनाचा साठा करणे पूर्णपणे थांबवावे. एकाच वेळी सर्वांनी पंपांवर गर्दी केल्याने शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतुकीचा खोळंबा होत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. या गर्दीमुळे रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना अडथळा निर्माण होऊ शकतो, याचे भान सर्वांनी ठेवावे.

'जिल्ह्यात इंधनाचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत आणि मुबलक आहे. नागरिकांनी अजिबात घाबरून न जाता संयम ठेवावा आणि शांतता राखावी. केवळ गरजेपुरतेच इंधन खरेदी करावे, विनाकारण साठा करू नये. सोशल मीडियावरून चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांवर प्रशासन सायबर कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई करेल.',असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# मनपाकडून १३४० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त; विक्रेत्यांवर कारवाई



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नागरिक मित्र पथकाने शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी धडक कारवाया करत प्रत्येकी २५,००० रुपये असा एकूण ५०,००० रुपयांचा मोठा दंडात्मक वसूल केला असून एकूण १३४० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त केले आहे.

पहिली कारवाई बीड बायपास परिसरातील 'ए आर इंटरप्राईजेस' येथे करण्यात आली, जिथे अंदाजे ८० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक आढळून आल्याने २५,००० रुपयांचा ऑनलाईन दंड वसूल करण्यात आला. तर दुसरी कारवाई गुरुवारी झोन नंबर ०२ मधील खारा कुवा येथील गुजराती शाळेसमोर असलेल्या 'सुराणा प्लॅस्टिक'च्या गोडाऊनवर करण्यात आली, जिथे तब्बल १२६० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिकचा साठा जप्त करत जागेवरच २५,००० रुपयांचा रोख दंड वसूल करण्यात आला.

महापौर समीर राजूरकर आणि महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिक विरुद्धातली मोहीम अत्यंत प्रभावीपणे चालवली जात आहे. शहराला प्लॅस्टिकमुक्त करण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या मोहिमेच्या मालिकेतीलच या मोठ्या कारवाया असून महानगरपालिकेचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे या संपूर्ण मोहिमेचे मुख्य संनियंत्रण करत आहेत.

बीड बायपास येथील कारवाईमध्ये स्वच्छता निरीक्षक आनंद तांबे, स्वच्छता निरीक्षक उमेश खरात यांच्यासह नागरिक मित्र पथकाचे गौतम वानखेडे, संतोष नवगिरे, रावसाहेब इथाटे आणि अरुण काकरवाल यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तर खारा कुवा येथील कारवाई नागरिक मित्र पथकाचे देविदास सुसर, स्वर्णसिंग परदेशी, बालाजी साबळे, जनार्दन सांगळे आणि मनपाचे जवान किशोर नाडे, संतोष जाधव व राजपाल बिर्डा यांच्या पथकाने यशस्वी केली.

जप्त करण्यात आलेला हा संपूर्ण प्लॅस्टिकचा साठा पुन्हा बाजारात जाऊ नये आणि त्याचा पुनर्वापर रोखला जावा यासाठी मनपा प्रशासनाकडून हर्सूल येथील कचरा प्रक्रिया केंद्रात तात्काळ नष्ट करण्यात आला.

या धडक कारवायानंतर प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहराच्या हद्दीतून प्रतिबंधित प्लॅस्टिक हद्दपार करण्यासाठी मनपा पूर्णपणे कटिबद्ध आहे. शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिक विरुद्ध मनपाचा हल्लाबोल कायम असून, प्रतिबंधित प्लॅस्टिक कॅरी बॅगचा वापर, साठा किंवा वितरण करणाऱ्या कोणत्याही घटकाला गय केली जाणार नाही. त्यामुळे सर्व व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे.

मनपाच्या या सातत्यपूर्ण आणि कडक कारवाईमुळे आता शहरातील नागरिकांमध्ये आणि छोट्या व्यावसायिकांमध्ये देखील जनजागृती वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शहरातील विविध भागांतील दुकाने, भाजीपाला आणि फळ विक्रेत्यांनी स्वतःहून पुढाकार घेत आपल्या गाड्यांवर व दुकानांवर 'आजपासून प्लॅस्टिक पिशव्या मिळणार नाहीत, कृपया खरेदीसाठी घरून पिशवी आणावी' अशा आशयाचे फलक लावून संदेश देण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत विक्रेते ग्राहकांना घरूनच कापडी पिशव्या आणण्याचा आग्रह धरत आहेत, ज्यामुळे या मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप येत आहे.

# मनपा कर्मचाऱ्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध; काळ्या फिती लावून कर्मचाऱ्यांचे आंदोलन




छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या लेखा विभागातील लिपिक अभिषेक सुनील ढेकळे यांच्यावर कर्तव्य बजावत असताना झालेल्या मारहाणीच्या घटनेचा महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी आज तीव्र निषेध व्यक्त केला. या घटनेच्या निषेधार्थ मनपाच्या सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज करत निषेध नोंदविला.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १९ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजता मनपा ठेकेदार मुबारक मेहबूब पठाण यांनी त्यांच्या बिल संदर्भातील फाईलबाबत विचारणा करताना लेखा विभागातील कर्मचारी अभिषेक ढेकळे यांना शिवीगाळ करून थप्पड मारल्याची घटना घडली. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

या घटनेमुळे महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून, कामकाजादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांना दमदाटी व दबावाचा सामना करावा लागत असल्याची भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

यासंदर्भात कर्मचाऱ्यांच्या वतीने मा. आयुक्त यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात संबंधित ठेकेदाराविरुद्ध तातडीने कारवाई करावी, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

निवेदन स्वीकारताना मा. आयुक्तांनी ही घटना दुर्दैवी असल्याचे नमूद करत, सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची तसेच संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. आयुक्तांच्या आश्वासनानंतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे आभार मानले.

त्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांनी घटनेचा निषेध नोंदवून शांततापूर्ण पद्धतीने आपापले नियमित कामकाज सुरू ठेवले. तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडल्यास सर्व कर्मचारी संघटनांच्या वतीने कायदेशीर व सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी लेखा विभागातील कर्मचारी अभिषेक ढेकळे,बहुजन कामगार शक्ती महासंघ अध्यक्ष संजय रगडे,लेखाधिकारी संजय कोलते, महेश दुबे, काम्रान फरहाद ,तीर्थराज धोपे, अजय दिडोरे, सतीश सौर ,अविनाश निकम,जितेंद्र खराडकर, अतुल बनकर,सय्यद कासम, ललित कापसे, ईश्वर कामेकर, प्रशांत हिसवणकर, पंदारे मॅडम मनीषा न्यायधीश, रुपाली शेळके पूनम क्षीरसागर विकास शिंदे, एस बाबर यांच्या सह मोठया संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

# स्थानिक प्राधिकारी विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर

## निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज- अपर जिल्हाधिकारी अडकुणे



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- औरंगाबाद- जालना स्थानिक प्राधिकारी विधान परिषद द्विवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून गुरुवार दि.१८ जून रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी करण्यात येत असून प्रशासन सज्ज आहे,अशी माहिती अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

औरंगाबाद- जालना स्थानिक प्राधिकारी विधानपरिषद द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून यासंदर्भात माहिती देण्यासाठी आज जिल्हाप्रशासनाने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेस निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत प्रथम निवडणूक कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. त्यानुसार निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे-

निवडणूक अधिसुचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक सोमवार दि.२५ मे २०२६,

नामनिर्देशन पत्रे सादर करण्याचा अखेरचा दिनांक सोमवार दि.१ जून २०२६,

नामनिर्देशन पत्राची छाननी मंगळवार दि.२ जून २०२६,

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक गुरुवार दि.४ जून २०२६,

मतदानाचा दिनांक गुरुवार दि.१८ जून २०२६,

मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायं.४ वा. पर्यंत.

मतमोजणीचा दिनांक सोमवार दि.२२ जून २०२६.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा दिनांक गुरुवार दि.२५ जून २०२६.

अपर जिल्हाधिकारी अडकुणे यांनी सांगितले की, या निवडणूकीसाठी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर व जिल्हाधिकारी जालना हे निवडणूक निर्णय अधिकारी असतील तर निवासी उपजिल्हाधिकारी हे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी असतील. यानिवडणुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेवर निवडून आलेले व नियुक्त सभासद हे मतदान करु शकतील. त्यात महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापती यांचा समावेश असेल. याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, मुख्याधिकारी यांच्याकडून मतदारांची यादी प्राप्त होईल. ही यादी अंतिम झाल्यावर त्यावर हरकती मागविण्यात येतील. त्यानंतर मतदार यादी अंतिम करण्यात येईल. निवडणुक आचार संहिता लागू झालेली असून आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सुचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत,असेही त्यांनी सांगितले.

# दहशतवाद व हिंसाचाराविरोधात एकजुटीची शपथ

## मनपा मुख्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस उत्साहात साजरा



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- देशाच्या अहिंसा, शांतता आणि सहिष्णुतेच्या महान परंपरेप्रती दृढ निष्ठा व्यक्त करत सर्व प्रकारच्या दहशतवाद व हिंसाचाराचा सर्व शक्तिनिशी सामना करण्याचा निर्धार आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालयात करण्यात आला. दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने प्रतिज्ञा घेत दहशतवादमुक्त आणि शांततामय समाज निर्मितीचा संकल्प केला.

यावेळी महापौर समीर राजुरकर, आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, शहर अभियंता संजय कोंबडे, मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, प्रभारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला भामरे तसेच उपआयुक्त लाखिचंद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.


कार्यक्रमात महापौर समीर राजुरकर यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञेचे वाचन केले. उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रतिज्ञेची पुनरावृत्ती करत देशाच्या एकात्मता, अखंडता आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी सदैव कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

दहशतवाद आणि हिंसाचाराला कोणत्याही परिस्थितीत थारा न देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. मनपा मुख्यालयातील सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

समाजात शांतता, बंधुभाव आणि राष्ट्रीय ऐक्याची भावना अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# रस्ताबाधित रेती, खडी व विटा विक्रेत्यांवर मनपाची धडक कारवाई

## किराडपुरा व एन-७ सिडको परिसरातून दोन हायवा साहित्य जप्त



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशान्वये तसेच मा. मुख्य अतिक्रमण नियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे व उपायुक्त सविता सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने शहरातील रस्ताबाधित अतिक्रमणांवर धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात रेती, खडी, विटा व बांधकाम साहित्य जप्त केले.

या मोहिमेअंतर्गत किराडपुरा येथील राम मंदिर रोड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अतिक्रमण करून ठेवण्यात आलेल्या रेती, खडी व विटांच्या साठ्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच एन-७ सिडको परिसरातील साखरे मंगल कार्यालय व गुलाब विश्व कार्यालय रोड येथेही रस्त्यालगत अडथळा निर्माण करणाऱ्या साहित्याविरुद्ध मोहीम राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान रस्त्यावर अतिक्रमण करून ठेवण्यात आलेली रेती, खडी, विटा तसेच इतर बांधकाम साहित्य आणि कचरा जप्त करण्यात आला. जप्त साहित्याची वाहतूक करून दोन मोठे हायवा भरून ते गरवारे स्टेडियम येथे जमा करण्यात आले.

शहरातील रस्ते वाहतुकीसाठी मोकळे ठेवणे, नागरिकांची गैरसोय टाळणे आणि सार्वजनिक जागांचा योग्य वापर सुनिश्चित करणे हा या कारवाईमागील उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. अतिक्रमण करून सार्वजनिक रस्त्यांवर बांधकाम साहित्य टाकणाऱ्यांविरुद्ध भविष्यातही अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचा इशाराही देण्यात आला.

सदर कारवाई इमारत निरीक्षक रवींद्र देसाई, सागर श्रेष्ठ तसेच नागरी मित्र पथकाच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली. मनपाच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील रस्ते मोकळे होऊन वाहतुकीला दिलासा मिळाला आहे.

## नीटचा पेपर फुटलाच नाही,...

यांनी समितीसमोर स्पष्टपणे सांगितले की, त्यांच्या सिस्टीममधून प्रश्नपत्रिका फुटली नव्हती. याचा अर्थ एनटीएने कोणतीही प्रश्नपत्रिका फुटल्याचे मान्य केले नाही. विरोधी खासदारांनी लगेचच प्रतिप्रश्न केला, 'जर प्रश्नपत्रिका फुटलीच नव्हती, तर परीक्षा रद्द का करण्यात आली? फेरपरीक्षेची काय गरज होती?' या प्रश्नाचे एनटीएच्या महासंचालकांकडे उत्तर नव्हते. नंतर, एनटीएअधिकाऱ्यांनी सांगितले की काही 'अनियमितता' आढळून आल्या आहेत आणि विद्यार्थ्यांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी फेरपरीक्षा घेतली जात आहे. दरम्यान, एनटीएने सांगितले की सीबीआय (केंद्रीय अन्वेषण विभाग) या प्रकरणाचा तपास करत आहे. जोपर्यंत सीबीआय पेपरफुटीची पुष्टी करत नाही, तोपर्यंत ते याला पेपरफुटी मानणार नाहीत असे म्हटले आहे.

## रेल्वे भरती आंदोलनप्रकरणी...

८ लोकांना आज निर्दोष सोडले आहे. सगळीकडे तरूणांनी आंदोलने केली त्यांचा संबंध राज ठाकरेंशी जोडला होता. राज ठाकरेंना या प्रकरणात तत्कालीन सरकारने अडकवण्याचा प्रयत्न केला, असं अविनाश जाधव म्हणाले. राज ठाकरेंनी निकालानंतर स्मितहास्य केलं. तसेच न्यायालयातून खाली येताना अस्वालाच्या अंगावरचा एक केस कमी असं राज ठाकरे म्हणाले, अशी माहिती अविनाश जाधव यांनी दिली.

न्यायालयात आज राज ठाकरे आणि इतर पक्ष यांचा जबाब घेण्यात आला होता. या गुन्हाशी माझा काहीही संबंध नाही असं राज ठाकरेंनी न्यायालयात सांगितलं होतं, आंदोलनावेळी मी नाशिकला होतो, असंही राज ठाकरेंनी न्यायालयात सांगितलं होतं.

## भाजपामध्ये सामील होण्याच्या निर्णयावर....

या प्रकरणाची सुनावणी केली. यावेळी राघव चड्ढा यांच्या वैयक्तिक हक्कांचं उल्लंघन झालं नसल्याचं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. 'भाजपामध्ये सामील होण्याच्या निर्णयावर कोणी टीका करणं हा वैयक्तिक हक्कांच्या उल्लंघनाचा प्रकार नाही', असं उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त पीटीआयने दिलं आहे.

भाजपाचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी त्यांच्यावरील बदनामीकारक पोस्ट हटवण्यासाठी दाखल केलेल्या अंतरिम याचिकेवरील आपला निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने राखून ठेवला आहे. मात्र, या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवलं. राघव चड्ढा यांच्या याचिकेसंदर्भात बोलताना न्यायालयाने म्हटलं की, "भाजपामध्ये सामील होण्याच्या तुमच्या राजकीय निर्णयावर तुमच्या मते टीका होत आहे. मात्र, प्रथमदर्शनी तुमच्या कोणत्याही वैयक्तिक अधिकारांचं उल्लंघन झालेलं नाही."

**नगर परिषद वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

**फोन नंबर (०२४३६-२२२०३६, फॅक्स नंबर (०२४३६-२२५२५६)**

Email : npvaijapur@gmail.com

जा.क्र.नपवै/कावि/पापुवस्ववि/२०२६/३११ दिनांक :-२१/०५/२०२६

**निविदा रद्द सुचना**

वैजापूर नगर परिषद न.प. फंड व इतर शासकीय निधी अंतर्गत **वैजापूर शहर पाणीपुरवठा वितरण जाळयासाठी वॉल चेंबर बांधणे.** या कामासाठी जा.क्र.नपवै/कावि/पापुवस्ववि/२०२६/ दि. १८-०५-२०२६ अन्वये निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. तथापी भारत निवडणूक आयोगाच्या दि. १८-०५-२०२६ रोजी प्रसिध्दकानुसार (Press Note No. ECI/PN/087/2026) महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या (ज्यामध्ये औरंगाबाद-जालना मतदार संघ समावेश आहे.) द्विवार्षीक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला असून, संबधीत क्षेत्रात तात्काळ प्रभावाने आचारसंहिता लागू झाली आहे. सदर निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने, दि. १८-०५-२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली वरील कामाची निविदा प्रक्रिया पुढील आदेशापर्यन्त रद्द/स्थगीत करण्यात येत आहे. याचे सर्व संबधित अनुभवी व रजिष्टर्ड गुत्तेदार/एजन्सी धारकांनी नोंद घ्यावी.

**ए.एम. सोनवणे**
**अभियंता, पाणी पुरवठा**
**नगर परिषद वैजापूर**

**बि.यु.बिघोत (राजपूत)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**

**डॉ. दिनेश पी. परदेशी**
**नगराध्यक्ष**
**नगर परिषद वैजापूर**